# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/05/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील बस स्टॅंड कोंढाळी येथे दिनांक ०२/०५/२०२३ चे १४.३० वा. ते १५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. जकिरा बानु मोक्तार अलि हाजी, वय ५१ वर्ष, रा. भानीचारापेठ कोंढाळी ता. काटोल जि. नागपुर ही अमरावती येथे जाणेकरीता फिर्यादीचे मुलाने फिर्यादीस बस स्टॅंड कोंढाळी येथे सोडले व फिर्यादी बस स्टॅंड कोंढाळी येथे अमरावती बस लागे पर्यत थांबली होती तेव्हा फिर्यादी जवळ पर्स मध्ये नगदी १५०००/— रू. व सोन्याचे दागीने पर्समध्ये होते काही वेळाने नंतर अमरावती बस लागली तेव्हा फिर्यादीला फोन आला असल्याने फिर्यादी फोनवर बोलत बोलत बस मध्ये चढली व बस मध्ये बसुन तिकीट काढणे करीता फिर्यादीने पर्स मध्ये पैसे पाहीले असता पर्स मधली लहान पर्स दिसली नाही त्या पर्स मध्ये फिर्यादीचे नगदी १५०००/— रू व जुने वापरते ६ ग्रॅमचे मंगळसुत्र व लहान ८ मोती किंमती अंदाजे १४५००/— रू असा एकुण २९,५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना तितरे ब. नं २०९७ मो. नं. ७४४७३२८०४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत मौजा मसला येथे दिनांक ०१/०५/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक ०२/०५/२०२३ चे ०६/०० वा. सुमारास फिर्यादी नामे— दिपक जयदेव सहारे, वय ३२ वर्षे, रा. मसला ता. रामटेक जि. नागपुर यांचे घराचे गाईचे गोठयामध्ये ठेवलेला महिंद्रा विवो ट्रॅक्टर क्र. ५७५ डी. आय या ट्रॅक्टरला लागलेली एक्सेस कंपनीची लाल रंगाची बॅटरी किंमती अंदाजे ४०००/— रु तसेच गावातील सुनिल सुर्यभान मदनकर यांचे ट्रॅक्टरला लागलेली बॅटरी किंमती अंदाजे ३,०००/— रु. असा एकूण ७,०००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो. ना उमेश इंगळे ब. नं. ८०६ पो. स्टे. अरोली मो. नं. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा आकेवाडा येथे दिनांक ०१/०५/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक ०२/०५/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रकाश बालकीसन बिटने, वय ३८ वर्ष, रा बाजारगाव ता. काटोल जि. नागपुर यांचे शेतातुन बंडीचे दोन लोखंडी चाक व लोखंडी आस्कुड किंमती अंदाजे २०००/— रू व जुनी पाण्याची इलेक्ट्रीक मोटार किंमती अंदाजे २०००/— रू असा एकुण ४०००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ तांदुळकर ब. नं ५०६ पोस्टे कांढाळी मो. नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा काटोल येथे दिनांक ०१/०५/२०२३ चे २१/३० वा. ते २२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अजिम नशीर शहा, वय ३२ वर्ष रा. पेठ बुधवार काटोल व त्याचा काका शगीर शहा हे फिर्यादीची आत्या खैरून शहा रा. हेटी हीचे घरासमोर बसले होते तिथेच जवळच लग्नाचा कार्यक्रम चालु होता तेथील काही मुले जोराजोरात ओरडत होते. यावरून तेथील मुलांना समजविण्या करिता फिर्यादी गेले असता, तिथे आरोपी क्र. १) नामे— **विशाल संजय सहारे** हा फिर्यादीस शिवीगाळ करायला लागला व तुम्हाला कोणता त्रास होत आहे असे म्हणून झगडा भांडण करायला लागला व तिथे खाली पडलेली विट उचलून फिर्यादीच्या डोक्यावर मारली तसेच फिर्यादीचा काका शगीर शाहा यांनी आरोपी क्र. १) याला तु अजीम याला का बर मारत आहे, असे विचारले असता आरोपी क्र. १) याने व त्याचे वडिल **आरोपी क्र. ०२) संजय सहारे** यांनी तिथेच पडलेली सेट्रींगची बल्ली उचलून फिर्यादीचे काका यांच्या डोक्यात मारली त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचे काका हे जखमी झाले. त्यानंतर ते उपचाराकरिता सरकारी दवाखाना काटोल येथे आले होते, काकाला जास्त मार लागला असल्याने त्यांना नागपुर रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परि. पोउपनि विक्की लोखंडे मो. नं ८६६८७८८७०७ हे करीत आहे.

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा खानगाव येथे दिनांक २९/०४/२०२३ चे १६.३० वा. ते दिनांक ०२/०५/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— किरन मारोतराव नेरकर, वय ४४ वर्ष, रा. खानगाव ता. काटोल हे घटना तारीख वेळी व ठिकाणी घराला कुलुप लावून खैरगाव ता. नरखेड येथे गेले होते. दि. ०२/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादीचा पुतण्या रूपेश नेरकर याने फोन करून सांगीतले की, तुमचे घराचे दार उघडे आहे. चोरी झाली असल्याचे सांगीतल्याने फिर्यादी हे खानगाव येथे आले व घरात आत जावून पाहणी केली असता, घराचे समोरील दाराचे कुलुप तुटलेले दिसले. लोखंडी कपाटाचे दार उघडे होते लॉकर खुले होते. लॉकरमधील स्टीलचे डब्यात ठेवलेले एक जुनी वापरती अंदाजे एक तोळयाची सोन्याची पोत किंमती अदांजे ३००००/— रू. एक सोन्याची अंगठी ३ ग्रॅम अंदाजे किंमती अंदाजे ९०००/— रू तसेच कानामधील सोन्याचे टॉप्स ३ ग्रॅम अंदाजे किंमती ९०००/— रू तसेच चांदीचा कमरपट्टा, पायातील पैंजन, एक करदोडा एकुण अंदाजे तीन तोळे चांदी अंदाजे किंमती ३०००/— रू असा एकुण ५१०००/— रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परि. पोउपनि. बोळगीर पोस्टे काटोल हे करीत आहे.

**२) पोस्टे नरखेड :—** अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा मोवाड येथे दिनांक ०१/०५/२०२३ चे १३.०० वा. ते १८.०० वा. पर्यंत यातील फिर्यादी नामे— रहुफ गफ्फार दिवान, वय ४९ वर्ष रा. वार्ड क्र. ११ मोवाड तह. नरखेड हे परीवारासह बाहेरगावी लग्ना करीता सौसर येथे गेले असता फिर्यादीचा चुलत भाउ हा फिर्यादीचे घराचे साफसफाई करून घराला लॉक लावुन आपले घरी गेला व १८.०० वा. परत आला असता घराचे समोरील दरवाज्याचा कोंडा तुटलेला दिसला. काणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचा घराचा दाराचा कोंडा तोडुन घराचे आत प्रवेश करून बेडरूम मधिल कपाटातील १५ ग्रॅमचे सोन्याचे दागीने किंमती अंदाजे २९,९००/— रूपये चांदीचे दागीने किंमती अंदाजे ३७५/—रू. व नगदी १०,०००/—रूपये असा एकुण ४०२७५/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास प्रेमराज सनेसर मो. नं. ८६७३४०४९०७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**